सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY
(Formerly University of Pune)

समन्वय कक्ष (माध्यम)
गणेशखिंड, पुणे

Media Co-ordination Cell
Ganeshkhind, Pune-7

१९ ऑगस्ट २०१९

# विद्यापीठाच्या 'इन्क्युबेशन-इनोवेशन-लिंकेजेस' विभागात प्रसिद्ध गुंतवणूकदार विक्रम महाजन यांचे व्याख्यान संपन्न

पुणे-
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या 'इन्क्युबेशन, इनोवेशन अँड लिंकेजेस' विभागामध्ये प्रसिद्ध गुंतवणूकदार आणि मुंबईच्या 'व्हाईटबॉक्स कॅपिटल'चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विक्रम महाजन यांचे व्याख्यान संपन्न झाले. नव्याने व्यवसाय सुरुवात करणाऱ्या नवउद्योजकांसाठी व्यवसायाचे मूल्यमापन करण्याबाबत आणि निधी मिळवण्याबाबत त्यांनी सखोल मार्गदर्शन केले.

विद्यापीठातील 'इन्क्युबेशन, इनोवेशन अँड लिंकेजेस' विभागातर्फे नवउद्योजकांसाठी हे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. नवउद्योजकांकडून त्यांच्या उद्योगांचे निधीच्या अनुषंघाने मूल्यमापन करण्याबाबत चुका होतात. त्यामुळे त्यांच्या उद्योगांसाठी निधी मिळवताना अडचणी येतात. या पार्श्वभूमीवर महाजन श्री. यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांनी सहभागींना योग्य पद्धतीने मूल्यमापन करण्याची प्रक्रिया आणि त्यातील बारकावे समजावून सांगितले. त्याचबरोबर त्यांनी, गुंतवणूक मिळवण्यासाठी कोणत्या प्रकारच्या गुंतवणूकदारांकडे प्रस्ताव सादर करावेत आणि या गोष्टींकडे गुंतवणूकदार कशा दृष्टीने पाहतात या गोष्टींबाबत सविस्तर माहिती सांगितली. हे व्याख्यान विद्यापीठात झाले. मात्र, त्याच वेळी २०० महाविद्यालयांमध्ये त्याचे थेट प्रक्षेपण केले गेले.

विद्यापीठाच्या 'इन्क्युबेशन, इनोवेशन अँड लिंकेजेस' विभागातर्फे अलीकडच्या काळात विद्यार्थ्यांसाठी उद्योजकतेबाबत जागरूकता उपक्रम हाती घेण्यात आला होता. त्यात सुमारे ७५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या विभागाच्या "सॅटर्डे क्लब" या उपक्रमात विविध क्षेत्रातील तज्ज्ञ आणि यशस्वी व्यक्ती सहभागी होतात आणि ते सहभागींना मार्गदर्शन करतात, अशी माहिती या विभागाच्या संचालक डॉ. अपूर्वा पालकर यांनी दिली.

**अभिजित घोरपडे**
विशेष कार्याधिकारी, माध्यम समन्वय कक्ष
sppumediacell@gmail.com